N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर  **P.S.(ठाणे):** गांधी चौकी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0249  **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/05/2023 02:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरम्यानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 19/05/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 22/05/2023
**Time From (वेळेपासून):** 12:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:54 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/05/2023  **Time (वेळ):** 01:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/05/2023 01:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** समाज कल्याण कार्यालय,बाहेरील महाईसेवा केंद्राचे समो, लातूर,लातूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अनिल विश्वनाथ कासले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हनुमान नगर, उदगीर रोडदेवणी,देवणी,गांधी चौकी,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हनुमान नगर, उदगीर रोडदेवणी,देवणी,गांधी चौकी,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7262070785

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तातेराव काषिनाथ जाधव, | | | 1. याकतपूर रोड,कसबे हस्पीटलच्या पाठीमागे,औसा, गांधी चौकी,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रुपये दराची 1 चलनी नोट | 500.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्यं (रू. मध्ये)):

500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेसट्र अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी अनिल विष्वनाथ कासले वय 43 वर्षे, व्यवसाय व्यापार (किराणा दुकान) रा. हनुमान नगर, उदगीर रोड, देवणी ता. देवणी जि. लातूर मो.नं. 7262070785.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मी मौजे देवणी गावचा राहणारा आहे. मी दिनांक 18/05/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे कार्यालयात येवून पोलीस उपअधीक्षक रेजितवाड साहेब व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांना भेटून एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरुन उदयिक रोजी सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे मी दिनांक 19/05/2023 रोजी सकाळी अंदाजे 09::00 वा. सुमारास लाप्रवि कार्यालय, लातूर येथे आलो असता तेथे असलेले पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर व त्यांच्या सोबत असलेल्या सापळा पथकातील सदस्य व पंचाची मला ओळख करून देवुन त्यांचे समक्ष माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नंाव वरीलप्रमाणे सांगुन पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांचे समक्ष माझी सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे.

"मी मौजे देवणी येथील राहणारा असून मी किराणा दुकान चालवून माझा उदरनिर्वाह भागवतो. मी सन 2022 मध्ये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत लातूर येथील कार्यालयात माझे किराणा दुकानासाठी एक लाखाचे थेट कर्ज या योजने अंतर्गत फाईल दाखल केलेली असून सदर फाईलची मंजूरी कुठेपर्यंत आली आहे. याबाबत विचारणा करण्यासाठी मी संबंधीत टेबलचे काम पाहणारे लिपिक जाधव यांना भेटलो असता त्यंानी माझी फाईल मंजूरीच्या कामात मदत करुन फाईल हेड ऑफीसला पाठवून देतो त्याकरिता मला 5,000/- रुपये द्यावे लागतील म्हणून लाचेची मागणी केली आहे. तरी संबंधीत कामाच्या अनुशंगाने लिपिक जाधव यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसुन मी त्यांना कुठलीही थकबाकी देणे नाही. मी आज रोजी पुन्हा लिपिक जाधव यांची भेट घेवुन संबंधीत कामासंदर्भाने चर्चा करुन किराणा दुकानासाठीच्या एक लाख थेट कर्जाची फाईल मंजूरीकरिता मदत करुन हेडऑफीसला पाठवून देण्याचे कामासंबंधी बोलणार असुन पुन्हा त्यांनी स्वतः अगर इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास संबंधीतांवर लाचेची कार्यवाही करण्यात यावी. तसेच माझेषी त्यांचा कुठल्याही प्रकारचा आर्थीक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही.'' अषा आषयाची लेखी तक्रार देवून माझे कामासंदर्भातील झेरॉक्स कागदपत्र सादर केले असता तक्रारीवर आणि कागदपत्रावर पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर व पंचानी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लिपिक जाधव यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या.

पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी सापळा पथकातील सदस्य व पंच असे खाजगी वाहनाने सकाळी अंदाजे 11::30 वाजता चे सुमारास समाज कल्याण कार्यालय, लातूर येथील पार्कींगमध्ये येवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 12::24 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 षिंदे असे कार्यालयाचे पार्कींग मधून पायी चालत बाजूलाच असलेल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत लातूर येथील कार्यालयात येथे जावून कार्यालयामध्ये समोरील खर्चीवर बसलेला काळा सावळा वर्ण असलेला ईसम हा लिपिक जाधव असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझ्ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष समोरासमोर चर्चा केली असता, लिपिक जाधव म्हणाले की, जामीनदार आले काय..? त्यावर मी म्हणालो जामीनदार येतो म्हणलं.. आता ते तुम्हाला विचारुन जावं म्हणून आलो.. असे बोलून पुढे मी म्हणालो मला कागाचं सांगा म्हणजे हेलपाटा होवू नये



Scanned with CamScanner

घडीघडीला.... तुम्ही बाहेर येवून चहा पिवून काय ते सांगा मला? पुढला मार्ग कळतय मला त्यावर लिपिक जाधव म्हणाले दोन वाजता या.. त्यावर मी हो.. असे म्हणून तेथून निघून आलो. अषी कामाची चर्चा करुन जाधव यांनी त्यांनी मला दोन वाजता या म्हणून सांगितल्याने मी त्यांना येतो म्हणुन मी व पंच क्रमांक 1 षिंदे असे पार्कीगमध्ये थांबलेल्या सापळा पथकाजवळ 12◌:34 वाजता परत आलो असता माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर कच्छवे यांच्याकडे दिले असता ते त्यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 षिंदे◌े यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व लिपिक जाधव यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 षिंदे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे◌े यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व लिपिक जाधव यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 षिंदे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन लिपिक जाधव यांनी माझ्या वर नमुद कामाच्या अनुशंगाने चर्चा करुन दोन वाजता या म्हणल्याने आम्ही कार्यालयाचे पार्की◌ंगमध्ये आडबाजूस थं◌ाबून राहीलो.

दोन वाजता पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 14◌:01 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 षिंदे असे कार्यालयाचे पार्की◌ंगमधून पायी चालत बाजूलाच असलेल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत लातूर येथील कार्यालयात येथे जावून लिपिक जाधव यांची भेट घेतली असता लिपिक जाधव म्हणाले बगा व्हॅल्यूवेषन करुन आणा.. दुसरे दोन सातबारे द्या...मी म्हणालो की दुसरे दोन...? त्यावर लिपिक जाधव म्हणाले त्येच्यावर बोजा नाही.. त्यावर मी चालतय.. त्यावर लिपिक जाधव जा मग त्याचं व्हॅल्यूवेषन करुन आणा जा.. त्यावर मी म्हणालो जातो सर .. चेक बुक दिले आहेत तुम्हाला... त्यावर लिपिक जाधव म्हणाले आधार ओळखपत्र घेतलं.. त्यावर मी आधार ओळखपत्र..? लिपिक जाधव म्हणाले ते तुमच्या फाईलमध्ये हाय ते आता वरी लावलेलं इथं एका जामीनदाराचा फोटो लावायचा इथं.. एक लावायचा... अषी चर्चा करित हे काय एक..एक लाखाचे प्रकरण पाठवणं चालू हाय.. त्यावर मी बरं.. त्यानंतर लिपिक जाधव म्हणाले तुमचं बी हाय.... आता तिस-या टप्यात तुमचं बी देवू पाठवून ठेवायचं नाही... पेरणीला पैसे बिसे काढावं लागतेत...तुम्हाला आलं का लक्षात त्यावर मी हं... अषी कामाबाबत चर्चा केली. जामीनदार सोमवारी आणा असे म्हणून त्यांनी परत सोमवारी या असे म्हणाल्याने तेथून मी व पंच क्रमांक 1 षिंदे असे पार्कीगमध्ये थांबलेल्या सापळा पथकाजवळ 14◌:10 वाजता परत आलो असता माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर कच्छवे यांच्याकडे दिले असता ते त्यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 षिंदे◌े यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व लिपिक जाधव यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 षिंदे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे◌े यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व लिपिक जाधव यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 षिंदे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री केली. सर्वानुमते पुढील सापळा कार्यवाही तात्पुरती स्थगित करुन सोमवार दिनांक 22/05/2023 रोजी करण्याचे ठरवुन पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी सापळा पथकातील सर्वांना गोपनियता राखणे बाबत सुचना दिल्या.

दि.22/05/2023 रोजी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी लिपिक जाधव यांनी सोमवारी बोलाविल्याप्रमाणे मी व पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पंच व सापळा पथकातील सदस्य असे समाज कल्याण कार्यालयाचे पार्कींगमध्ये ठरल्याप्रमाणे 10◌:00 वाजता एकत्र येवून पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पंच क्रमांक 1 षिंदे यांना माझे सोबत परत पाहील्यास संषय येण्याची दाट षक्यता असल्यामुळे पंच क्र. 2 अंबेकर यांना पंच क्रमांक 1 षिंदे यांचे ठिकाणी पडताळणी करिता पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर साहेब यांनी पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 11◌:01 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन मी व पंच क्रमांक 1 अंबे◌ेकर असे कार्यालयाचे पार्की◌ंगमधून पायी चालत बाजूलाच असलेल्या वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत लातूर येथील कार्यालयात जावून कार्यालयामध्ये समोरील खर्चीवर बसलेला काळया रंगाचा जांभळा षर्ट घातलेला ईसम हा लिपिक जाधव असल्याचे अंबेकर यांना सांगितले. लिपिक जाधव कामाच्या कागदपत्राच्या अनुशंगाने चर्चा करित म्हणाले जामीनदाराचा रेषनकार्ड.. त्यच्यावर सही-षिक्का आणा.. त्यावर मी म्हणालो एकाचे आले दोघाचे..? त्यावर लिपिक जाधव म्हणाले एकाचेच.. मी म्हणालो हं.. त्यावर लिपिक जाधव म्हणाले त्याच्यानंतर सातबारा, आठ अ.... मी म्हणालो की हं.. अषी चर्चा करित कागदपत्रे लिपिक जाधव यांना देवून मी म्हणालो किती ? त्यावर लिपिक जाधव पाच.. म्हणून पाच हजाराची लाच मागणी केली. त्यावर मी लिपिक जाधव यांना म्हणालो पाच हजार ? का पाचषे ?



Scanned with CamScanner

त्यावर लिपिक जाधव म्हणाले आता फक्त पाचषे द्या.. बाकीचे नंतर द्या.. आताच घेवून का मरायचंय का ? अं.. काम झाल्यावर द्या की.. असे म्हणून कामाचे अनुशंगाने चर्चा करुन स्पष्टपणे 5000/- रुपये लाचेची मागणी करुन 500/- रुपये लाचेची रक्कम आता घेवून येण्यास सांगितल्याने थोडया वेळात घेवून येतो म्हणून मी व पंच क्रमांक 1 अंबेकर असे तेथून निघून 11:37 वा. चे सुमारास पार्कींगमध्ये थांबलेल्या सापळा पथकाजवळ आलो असता माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर कच्छवे यांच्याकडे दिले असता ते त्यांनी बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 अंबेकर यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व लिपिक जाधव यांच्यात कांय बोलने झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 अंबेकर यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व लिपिक जाधव यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 अंबेकर यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन लिपिक जाधव यांनी माझ्या वर नमुद कामाची फाईल मंजूरी करिता मदत करुन हेड ऑफीसला पाठविण्याकरिता जाधव लिपिक यांनी स्वतःचा प्रभाव निर्माण करुन सध्या 5,00/- रुपये व काम झाल्याचे नंतर असे म्हणून लाचेची मागणी केल्याचे निश्पन झाले. सदर रक्कम घेवून आल्यास बाहेरच भेटण्याबाबत सांगितले.

पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी मला लिपिक जाधव यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराची एक भारतीय चलनी नोट समक्ष हजर केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोना 1253 गिरी यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या षर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळयातील रुमाल काढून हातात घेणे बाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या.

पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 12:44 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकावुन दिले त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 अंबेकर असे समाज कल्याण कार्यालयाचे बाहेर असलेल्या हॉटेल जवळ येवून फोन केला. त्याप्रमाणे मी पंचासमक्ष चहा टपरीवर गेलो असता लिपिक जाधव हे तेथे आल्यावर त्यांची भेट घेवून त्यांचेकडे माझ्या कामाबाबत चर्चा करीत असताना लिपिक जाधव म्हणाले हं.. घेवनू ये सद्या करतो मोकळं करुन टाकतो.. मी त्यांना म्हणालो हं... त्यावर जाधव म्हणाले ठिवत नाही.. कसं ठिवण.. पटकून देवून टाकतो तुम्हाला.. काही काळजी करु नका.. काही नाही.. असे म्हणत बाजूच्या महाईसेवा केंद्राचे समोर सोबत घेवून जावून लिपिक जाधव यांनी आपल्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून डोळयाची भूवया उंचावून लाचेची.रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे षर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषातील अॅन्थ्रासीन पावडरयुक्त 500/- रुपये (ज्यात 500/-रुपये दराची 1 चलनी नोट) लाचेची रक्कम काढत तुम्ही म्हणल्याप्रमाणे 500/-रूपये,.. बाकीचं तुमचं झालं की काम.. म्हणून लिपिक जाधव यांचे पुढे धरली असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने सदरची अॅन्थ्रासीन पावडरयुक्त 500/-रुपये (ज्यात 500/-रुपये दराची 1 चलनी नोट ) लाचेची रक्कम स्वीकारुन त्यांच्या अंगातील बदामी रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली. त्यानंतर मी म्हणालो स्थळ तपासणीला तुमच्या तिकडं आलो का ? त्यावर मी हं.. म्हणून मान डोलावली असता लिपिक जाधव म्हणाले तवा ती राहिलेलं करुन टाका.. त्यावर मी तिकड देवून का ? त्यावर लिपिक जाधव हं.. आले की.. त्यावर मी हो असे म्हणून मी लागलीच नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर व पंच क्रमांक 2 षिंदे व सापळा पथकातील सदस्य सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्डर पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी पंच क्रमांक 1 अंबेकर यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 अंबेकर यांनी समोर जांभळा रंगाचा षर्ट घातलेल्या ईसमाकडे हात करुन हे लिपिक जाधव असुन त्यांनी मागणी केलेली 500/-रुपये लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर घेवून लिपिक जाधव यांनी त्यांच्या अंगातील बदामी रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिषामध्ये ठेवली आहे. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 अंबेकर यांनी सांगीतली त्यावेळी पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी त्यांचेकडील ओळखपत्र लिपिक जाधव यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव तातेराव काषिनाथ जाधव वय 40 वर्शे, पद - लिपिक, नेमणुक वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत लातूर, जिल्हा कार्यालय, लातूर रा. याकतपूर रोड, कसबे हॉस्पीटलच्या पाठीमागे, औसा जि. लातूर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी पंच क्रमांक 2 षिंदे यांचे हस्ते लिपिक जाधव यांच्या जवळील अंगातील बदामी रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या



Scanned with CamScanner

बाजूच्या खिषामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 अंबेकर यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर यांनी पुढील कार्यवाही करणे करिता लिपिक जाधव यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून लाप्रवि कार्यालय लातूर येथे येवून पुढील कार्यवाही पुर्ण केली.
तरी यातील इतर लोकसेवक तातेराव काषिनाथ जाधव वय 40 वर्षे, पद- लिपिक, नेमणुक वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादीत लातूर, जिल्हा कार्यालय, लातूर रा. याकतपूर रोड, कसबे हॉस्पीटलच्या पाठीमागे, औरा जि. लातूर यांनी माझी किराणा दुकानासाठी एक लाखाचे थेट कर्ज या योजने अंतर्गत कर्ज फाईल मंजूरीच्या कामात मदत करुन सदर फाईल हेड ऑफीसला पाठवून देतो म्हणून स्वतःचा प्रभाव निर्माण करुन माझेकडे सुरुवातीस 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 500/- रुपये अमज आणून देण्यास सांगून लाचेची रक्कम स्वतः आज रोजी दि.22/05/2023 रोजी मागणी करुन आज रोजी समाज कल्याण कार्यालयाचे बाहेरील महाईसेवा केंद्राचे समोर लाचेची रक्कम स्वतः 12.54 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी विरुध्द कायदेषिर तक्रार आहे.
मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोना गिरी यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
PREMPRAKASH MAROTRAO MAKODE(I (Inspector)) / PORN64195 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.नि. अंमलदार
पो.ठाणे गांधी चौक लातूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** PREMPRAKASH MAR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN64195



Scanned with CamScanner